रे.के. नं. ६७ /२०२०

नि. क्र. २८

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा जबाब शथपेवर सुरु.**

**नाव** – रमेश रामा कापडुले,

**वय**– ५५ वर्षे, **नोकरी**– शेती,

**सध्या राहणार** – मुंबई,

**मुळ राहणार** – मोर्डे, गवळीवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. गुरुपातगोळ यांच्याकडून –**

०१. दि. २०/०८/२०२० रोजी मी मोर्डे, गवळीवाडी येथे होतो. आम्हाला त्यादिवशी पोलीसांनी पंचनाम्याला बोलावले. माझ्या बरोबर दत्ताराम धोंडू वाजे देखील होते. तो पंचनामा अनिता शांताराम कोटकर यांच्या अंगणात झाला. मी गेलो त्याठिकाणी मी, दत्ताराम वाजे, पोलीस व अनिता कोटकर उपस्थीत होत्या. पोलीसांनी कोयती जप्त केली. पोलीसांनी आम्हाला कोयती दाखविली. पोलीसांनी आम्हाला सांगितले की, अनिता शांताराम कोटकर यांना रविंद्र कोटकर यांनी मारले होते. मला ती कोयती दाखविल्यास मी ती ओळखू शकतो. मला दाखविण्यात आलेली कोयती तीच आहे. साक्षीदाराला कोयतीवरील लेबलवरील त्याची सही दाखविण्यात आली. ती सही माझीच आहे. सबब, कोयतीला **आर्टीकल अ** देण्यात आले.

०२. पोलीसांनी ती कोयती जप्त केली. त्यावर लेबल लावले. अंगणाच्या आजू–बाजूला घरे आहेत. पोलीसांनी पंचनाम्यावर माझी सही घेतली. सही मी वाचून केली होती. साक्षीदाराला आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर सांगितल्याप्रमाणेच आहे. घटनास्थळ पंचनाम्याला **निशाणी २९** देण्यात आले.

०३. पोलीसांनी त्याठिकाणी घराचा नकाशा काढला. साक्षीदाराला आता दोषारोपपत्रबरोबर दाखल घटनास्थळाचा कच्चा नकाशा दाखविण्यात आला. हा आमच्या समक्ष

काढण्यात आला होता. त्यावर माझी सही आहे. घटनास्थळाच्या कच्चा नकाशाला **निशाणी ३०** देण्यात येते. हा पंचनामा सकाळी ०८.०० ते ०९.०० या कालावधीत झाला.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडुन –**

०४. अनिता कोटकर या आमच्या शेजारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचे त्यांच्याशी चांगले संबंध आहेत. ऑगस्ट २०२० मध्ये भात लावणीचा हंगाम असतो. हे म्हणणे खरे नाही की, ऑगस्ट २०२० मध्ये २०/०८/२०२० रोजी मी नेहमीप्रमाणे शेतीच्या कामाकरीता घरातून बाहेर पडलो होतो. माझ्या घरापासून रविंद्र कोटकर यांचे घर चालत ०२ ते ०३ मिनीटे अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, अनिता कोटकर यांच्या घराच्या आजूबाजूला इतर राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरापेक्षा ही इतर आजूबाजूची घरे कमी अंतरावर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अनिता कोटकर यांच्या अंगणामधील परीसर माझ्या घरातून थेट दिसू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनेपूर्वी माझा संपर्क क्रमांक पोलीसांकडे नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांची माझी ओळख नसताना व माझा संपर्क क्रमांक त्यांच्याकडे नसताना मला व्यक्तीशः पंचनाम्याकरीता बोलवायचे काही विशेष कारण नव्हते. मला हे आठवत नाही की, २०/०८/२०२० रोजी कोणता वार होता. माझ्या म्हणण्याप्रमाणे चार पोलीस अधिकारी त्यादिवशी हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, मला त्यांची नावे सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याच्या कागदावर मी मूर्शी पोलीस स्टेशनला सही केली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे मोर्डे गावात मी एक सही केली. माझ्या

म्हणण्याप्रमाणे मूर्शी दूरक्षेत्रात मी दोन सहया केल्या. हे म्हणणे खरे आहे की, मूर्शी दूरक्षेत्रात लिखाण केले व मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी वर्णन केलल्या मूद्देमालाचे निश्चीत वर्णन मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अशाप्रकारच्या कोयत्या कोकणात सर्व घरात आढळून येतात. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ येथे तो विशीष्ट एका व्यक्तीचा असल्याबाबत त्यावर खूण नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनाम्याला बोलावले, त्यावर मी वाचून सही केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे व मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही**.

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.04.10 16:14:43 +0530

**(श्रीमती श्रुती ह. पाटील)**

**दिनांक ०८/०४/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**